दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक ३२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.३ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल शहरात पोलिसांचे सशस्त्र संचलन

## ‘रमजान ईद’ची पार्श्वभूमी : कायदा, सुव्यवस्थेसाठी प्रशासन सतर्क



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पनवेल शहर पोलीस प्रशासनाच्या वतीने सोमवारी ता.२ रोजी पनवेल शहरात सशस्त्र संचलन करण्यात आले. पोलिसांचा फौजफाटा पाहून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

’रमजान ईद’च्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्त यांनी परिमंडळ १ व २ मधील सर्व पोलीस ठाण्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कुठेही अनुचित प्रकार घडू नये याची दक्षता घेण्याच्या सूचना करीत प्रमुख मार्गांवर रात्रीची गस्त वाढवून नाकाबंदी करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

या पार्श्वभूमीवर परिमंडळ २ चे पोलीस उपयुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पनवेल शहर शहरात संचलन केले. कमरेला पिस्तूल व रिव्हॉल्व्हर लावलेले अधिकारी, हातामध्ये बंदुका व लाठय़ा घेतलेले पोलीस, वॉकीटॉकी घेऊन संदेश पोहोचविणारे बिट मार्शल यांसह वाहनांचा ताफा अशा संपूर्ण नियोजनात हे संचलन करण्यात आले

# पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना पाच लाखांच्या विम्याचे संरक्षण देण्याकरिता केंद्राची मदत घेऊ : आ.संजय केळकर

## पेण अर्बन बँकेच्या शेवटच्या ठेवीदारांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार



**दै.रायगड नगरी । पेण**


पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना पाच लाखांच्या विम्याचे संरक्षण देण्याकरिता केंद्र शासनाची मदत घेऊ व शेवटच्या ठेवीदारांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवु अशी घोषणा आमदार संजय केळकर यांनी पेण येथे पेण अर्बन बँक संघर्ष समितीच्या आंदोलनाच्या प्रसंगी केली. केंद्र सरकारच्या मदतीने परिवर्तन निदेशालय (ईडी) कोर्टाकडे पेण अर्बन बँकेच्या असलेल्या मालमत्ता लवकरात लवकर त्यांच्याकडून घेऊन त्याचा विनियोग ठेवीदारांचे पैसे देण्याकरिता करण्यात यावा याकरिता विशेष प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

या आंदोलनात पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे अध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, आमदार संजय केळकर, पेणचे आमदार रवीशेठ पाटील, उरणचे आमदार महेश बालदी, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संघर्ष समिती कार्याध्यक्ष नरेन जाधव, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, डी.बी.पाटील, पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य वैकुंठ पाटील, ललित पाटील, नगरसेवक प्रकाश पाटील, शोमेर पेणकर, अजय क्षीरसागर, संघर्ष समितीचे नामदेव कासार, ज्ञानदेव बांधल, मधुकर कुलकर्णी, दिलीप निंबाळकर, गजानन गायकर, दिलीप दुधे, मंगला खरे, विभावरी भावे, संदीप मोने, साकिब मुजावर, वासुदेव पाटील यांच्यासह असंख्य संख्येने ठेवीदार उपस्थित होते.

पेण अर्बन बँकेच्या संचालकांनी २ टक्के जास्त व्याज देण्याचे आमिष दाखवून गोरगरीब सामान्य नागरिकांच्या कष्टाचे पैसे गोळा करून ७५८ कोटी रुपयांचा घोटाळा केला. आणि ठेवीदारांना वाऱ्यावर सोडले. ठेवीदारांना न्याय मिळवून देण्याकरिता पेण अर्बन बँकेचा मुख्य आरोपी शिशिर धारकर याच्या बंगल्याला १० हजार ठेवीदारांना घेऊन आपण घेराव घालणार असल्याची घोषणा आमदार रवीशेठ पाटील यांनी यावेळी केली. ठेवीदारांसाठी आमची जेलमध्ये जाण्याचीही तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. धारकर व त्याच्या बगलबच्चांनी पेण नगर परिषदेच्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांना दमदाटी करून नगरपालिकेचा .../२

# माथेरान मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांची कर्जत येथे प्रभारी मुख्याधिकारी पदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । माथेरान**



कर्जतचे मुख्याधिकारी पंकज पाटील यांची वसई विरार महानगरपालिका वर उपायुक्त या पदावर ती पदोन्नती झाल्यामुळे माथेरानच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे (शिंदे) यांच्याकडे कर्जत नगरपालिकेचा पदभार देण्यात आला आहे.

माथेरानमध्ये मुख्याधिकारी उपलब्ध नसताना कर्जत येथील मुख्याधिकार्यांनी माथेरान येथे प्रभारी मुख्याधिकारी म्हणून काम नेहमीच पाहत आले आहेत. पण यावेळी पहिल्यांदाच माथेरानच्या मुख्याधिकारी असलेल्या सुरेखा भणगे शिंदे ह्या कर्जतच्या प्रभारी मुख्याधिकारी हा पदभार सांभाळणार आहेत. कर्जतचे मुख्याधिकारी पंकज पवार पाटील यांना वसई–विरार महानगरपालिकेमध्ये पद–ोन्नती मिळाली असून उपायुक्त पदावर ते रुजू होण्यासाठी २ /५ /२०२२ ही तारीख देण्यात आली आहे.

त्यामुळे तातडीने कर्जतचे मुख्याधिकारी हे पद खाली होणार असल्याने येथून जवळ असलेल्या माथेरानच्या मुख्याधिकार्यांना प्रभारी मुख्याधिकारी म्हणून आपले काम सांभाळून कर्जत नगरपालिकेचा कार्यभार सांभाळण्याचे आदेश जारी केले आहेत. त्यामुळे आता माथेरानच्या मुख्याधिकारी यांच्याकडे माथेरान व कर्जत ह्या दोन्ही नगरपालिकांचा कार्यभार असणार आहे या नियुक्तीमुळे माथेरान मधून सर्व स्तरातील मंडळींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्लास्टिक कचऱ्यावर हुतामाकी कंपनीचा तोडगा, कंपनीच्या सिएसआर मधून रिसायक्लिंग प्लांटचे उद्घाटन

## महिन्याला ६० टन प्लास्टिक कचऱ्याचा करणार पुर्नवापर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जगाने आधुनिकतेचा मार्ग अवलंबला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस प्रगतीच्या दिशेने जगाची वाटचाल सुरू आहे. अशात नागरीकिकरण देखील झपाट्याने वाढते आहे. तेव्हा कचऱ्याची समस्या देखील त्यामुळे जगात उभी राहिली आहे. त्यात प्लास्टिक हा विघटन न होणारा घटक असल्याने ती एक मोठी समस्या म्हणून समोर आली आहे. रायगड जिल्ह्यात पसरलेला आणि ग्रामीण शहरी असा भौगोलिक परिसर असल्याने येथेही प्लास्टिक कचरा अनेक ठिकाणी दिसून येतो. त्यामुळे या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी हुतामाकी कंपनी सरसावली आहे. कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीमधून खोपोली रानसई येथे प्रायोगिक तत्त्वावर प्लांट सुरू करण्यात आला आहे. याचे उद्घाटन २ मे रोजी करण्यात आले.




रोजच्या वापरात प्लास्टिक हे असतेच कधी ते चिप्सचे पाकीट असो, साबणाचे कवर, कधी अजून कुठल्या रूपाने पण हे प्लास्टिक नंतर कचऱ्यात कुठेही टाकून दिले जाते. त्यामुळे जनावरांच्या पोटात, नदीत, समुद्रात हे प्लास्टिक जात असते. एकूण काय तर नंतर पर्यावरणाची हानी या प्लास्टिकमुळे होते. तेव्हा पॅकेजिंग, मध्ये काम करणाऱ्या हुतामाकी या कंपनीने या समस्येवर उपाययोजना सुरू केल्या आ–हेत. प्लास्टिकचा पुनर्वापर केल्यास प्लास्टिक कचरा आपण संपवू शकतो अशी नवी संकल्पना कंपनीने जनसामान्यांच्या मनात रुजवायला सुरुवात केली आहे. त्यासाठी खोपोली येथे प्लास्टिक रिसायकल प्लांट चे नुकतेच उद्घाटन करण्यात .../२

## संक्षिप्त...

### नवाब मलिकांची प्रकृती खालावली ; जे.जे. रुग्णालयात दाखल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नवाब मलिक यांना वैद्यकीय कारणासाठी जामीन देण्यास सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) विरोध केला आहे. मात्र, मलिक यांना रुग्णालयात उपचार घेऊन देण्यास आम्ही तयार आहोत, असे ’ईडी’कडून विशेष न्यायालयात सांगण्यात आले. आता न्यायालयाकडून ५ मे रोजी मलिक यांच्या जामीन अर्जावर सुनावणी होणार आहे

मात्र, सध्या तुरुंगात असल्यामुळे नवाब मलिक यांची प्रकृती प्रचंड खालावल्याची माहिती समोर येत आहे. नवाब मलिक यांना सोमवारी स्ट्रेचरवर झोपवून मुंबईतील जे.जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. गेल्या तीन दिवसांपासून ते खूप आजारी आहेत, अशी माहिती नवाब मलिक यांच्या वकिलांनी पीएमएलए न्यायालयात दिली. त्यामुळे नवाब मलिक यांना मानवतावादी दृष्टिकोनातून अंतरिम वैद्यकीय जामीन द्यावा, अशी विनंती करण्यात आली. यावर न्यायालय आता ५ मे रोजी काय निकाल देणार, हे पाहावे लागेल. जे.जे. रुग्णालयाच्या अहवालानंतर नवाब मलिक यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी परवानगी मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, नवाब मलिक यांच्याशी संबंधित १५ कोटी रुपयांच्या मालमत्तांवर सक्तवुसली संचालनालयाने (ईडी) टाच आणली. मलिक हे सध्या अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमसंबंधी गैरव्यवहाराच्या आरोपाखाली अटकेत आहेत.

# राणा दाम्पत्याचा तुरुंगातील मुक्काम वाढला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्या जामीन अर्जावर कोर्टाने आज निर्णय दिला नाही. बुधवारी सकाळी हा निर्णय दिला जाईल, असे न्यायाधीशांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे राणा दाम्पत्याचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानासमोर हनुमान चालीसा पठण करण्याचा निर्धार राणा दाम्पत्याने केला होता. त्यासाठी ते अमरावती येथून मुंबईत दाखल झाले होते. मात्र , शिवसैनिक आक्रमक झाल्याने व कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने राणा दाम्पत्याला माघार घ्यावी लागली होती. राजद्रोहासह अनेक



गंभीर कलमे लावून राणा दाम्पत्याला अटक करण्यात आली आहे. ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. राणा दाम्पत्याने मुंबई सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला असून त्यावर आज सायंकाळी पाच वाजेपर्यंत निर्णय देण्याचे संकेत मिळत होते. मात्र, वेळेअभावी हा निर्णय लांबणीवर गेला आहे. आता बुधवारी हा निर्णय दिला जाईल , असे न्यायाधीशांकडून नमूद करण्यात आले आहे. .../२

# अल्पवयीन मुलीवर शारिरीक अत्याचारप्रकरणी आरोपीला मरेपर्यंत कारावासाची शिक्षा

## वाकण खांबेश्वरवाडीतील पोक्सो गुन्ह्यात माणगांव विशेष न्यायालयाचा निर्णय

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील वाकण–खांबेश्वरवाडी येथे एका अल्पवयीन मुलीवर मोबाईल दाखविण्याच्या बहाण्याने चुलता असलेल्या एका अपंग व्यक्तीने शारिरीक अत्याचार केल्याच्या पोक्सो गुन्ह्यामध्ये अपंग चुलत्याला माणगांव विशेष न्यायालयाने मरेपर्यंत कारावासाची शिक्षा ठोठावली असल्याने तालुक्यातील अन्य पोक्सो गुन्ह्यातील जामिनावर सुटलेल्या आरोपींची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.

सोमवार,दि.२० जुलै २०२०रोजी दुपारच्या सुमारास पिडीत आठ वर्षीय मुलीला मोबाईल दाखविण्याच्या बहाण्याने तिच्या अपंग असलेल्या काकाने तिला बोलावून घेतले आणि ती मुलगी अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही तिच्याशी शारिरीक संबंध प्रस्थापित करून या प्रकाराबाबत कुणासही काहीही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

इयत्ता तिसरीमध्ये शिकणाऱ्या या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला असून पोलादपूर पोलीसांनी याप्रकरणी पोक्सो कायद्यानुसार गुरूवारी रात्री सव्वाअकरा वाजण्याच्या सुमारास गुन्हा दाखल करून पिडीत मुलीच्या अपंग काकाला अटक केली. यावेळी आरोपीविरूध्द भा.दं.वि.कलम ३७६,३७६ एबी,३७६ (२), (एफ), (आय), (जे), (के), (एन), ३७७, ५०६ पोक्सो कलम ३, ४, ५, (एल),(एम), (एन), ६,९, (एल),(एम), (एन) अन्वये गुन्हा दाखल केला होता. यावेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे उपनिरिक्षक महेंद्र लोणे यांनी दोषारोप पत्र तयार केले तर सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांनी माणगांव येथील मा.जिल्हा व सत्र न्यायालयासमोर दाखल केले.

या पोक्सो खटल्याची सुनावणी माणगाव येथे विशेष न्यायालयामध्ये झाली असता पिडीत .../२

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ‘उत्सव महाराष्ट्राचा संस्कृती महाराष्ट्राची’ कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमीत्त भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा नावडे शहर व मैत्री प्रतिष्ठान यांच्या वतीने ’उत्सव महाराष्ट्राचा संस्कृती महाराष्ट्राची’ हा बहरदार संगीतमय कार्यक्रम तसेच विशेष सन्मान पुरस्कार सोहळा पार पडला. हा सोहळा नावडे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात संपन्न झाला. ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.



या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरूणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, पनवेल महापालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेवक हरेश केणी, तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, खांदा कॉलनी युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक भोपी, जिल्हा सदस्य पवन भोईर, युवा मोर्चा उपाध्यक्ष अमर ठाकूर, जेष्ठ नेते रवींद्र खानावकर, नावडे शहर अध्यक्ष मदन खानावकर, उत्तर रायगड युवा मोर्चा अध्यक्ष मयूरेश नेतकर, पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस दिनेश खानावकर, जितेंद्र काटकर, युवा नेता महेश पाटील, शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष .../२

# विना परवाना वाहतुकीवर वन विभागाची कारवाई

**दै.रायगड नगरी । धाटाव**

मुंबई गोवा महामार्गावर कळमजे गावानजीक टाटा कंपनीच्या मालवाहू ट्रक मधे विना परवाना खैर जातीच्या झाडांची वाहतुक करताना वन विभागाने कारवाई केली.या कारवाईत वन विभागाच्या आधिकारी वर्गाला अंदाजे ५ लाखांचा माल हाती लागला आहे.

वन विभागाला मिळालेल्या गुप्त माहिती नुसार मुंबई गोवा महामार्गावर माणगाव(कळमजे) नजिक टाटा कंपनीचा मालवाहू ट्रक क्रमांक जी जे १५ एक्स,एक्स /९३६६ तपासले असता त्यामधे अवैध वृक्ष तोडीचा विनापरवाना वाहतूक केलेलं खैर सोलिव नग २८२,घमी ४.८१६ किंमत ७७८६२ रुपये व ट्रक अंदाजे किंमत ५ लाख इतके एकूण ५ लाख ७७८६२ रुपये इतका भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(१)(फ), ४१, ४२ अन्वये मुद्देमाल जप्त केला.सदर गुन्हेकामाच्या तपासाअंती दीलशाद अहमद शेख रा.गुजरात, अब्बास खान रा.वापी (फरार आरोपी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर उपवनसंरक्षक रोहा अप्पासाहेब निकत व सहाय्यक वनसंरक्षक रोहा विश्वजित जाधव यांच्या .../२

# हिंद मराठा महासंघ सुरत येथे आयोजित मेळाव्यात शेकडो समाज बांधव मोठ्या प्रमाणात सामील




**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुजरात राज्य सुरत शहर येथे आज हिंद मराठा महासंघ आयोजीत करण्यात आलेल्या मेळाव्यास सुरत येथे शेकडो समाज बांधव प्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राज्यभर गरुड भरारी घेत संघटना वाढीसाठी समाज बांधव मोठ्या प्रमाणात अथक परिश्रम घेत आहेत त्या सर्वांना धन्यवाद असे प्रतिपादन राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले यांनी सुरत येथे आयोजित केलेल्या मेळाव्यात बोलताना व्यक्त केले या वेळी सुरत शहर कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष उज्वलसिंह राजे गायकवाड, राष्ट्रीय उपाध्यक्ष ऍड आनंदराव भोसले, राष्ट्रीय उपाध्यक्ष गणेश शेडगे, कोकण प्रदेशाध्यक्ष विनोदराव चव्हाण, राष्ट्रीय सचिव शिवाजीराव पालांडे, राष्ट्रीय सल्लागार हेमंत बाबुराव शिंदे, राष्ट्रीय सल्लागार किशोर केसरकर, राष्ट्रीय सरचिटणीस ड किशोर बांदल देशमुख, हरियाणा राज्य अध्यक्ष राम नारायण मराठा, गुजरात राज्य अध्यक्ष देवेश माने, बडोदे जिल्हा अध्यक्ष प्रदीप मोरे, सुरत जिल्हा अध्यक्ष संतोष मालुसरे, शहर अध्यक्ष राजुभाई शेवाळे, दक्षिण गुजरात प्रमुख ड विराज सुर्वे तसेच गुजरात राज्य सरचिटणीस पदी उद्योजक विजय कदम यांची निवड जाहीर करण्यात आली. तापी नदी किनारी वसलेल्या निसर्गाच्या सानिध्यात तुळजा भवानी अम्रोली भव्य प्रांगणात भव्य मेळावा संपन्न झाला. या वेळी सुरत शहर कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले तसेच लिमाबवत येथील शिवरायांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी डी वाई एस पी पाटील व अन्य मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# यु.ई.एस.स्कूलमध्ये महाराष्ट्र दिवस उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा आज ६२ वा वर्धापनदिन. संपूर्ण महाराष्ट्रासह यु.ई.एस.स्कूल ॲण्ड कॉलेजमध्ये 'महाराष्ट्र दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. १०५ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर देशाला आजच्या दिवशी मराठी माणसांसाठी एक हक्काचं राज्य मिळालं, आणि ते म्हणजे मुंबईसह महाराष्ट्र राज्य. दरवर्षी १मे रोजी महाराष्ट्र दिवसाबरोबरच् आंतराष्ट्रीय कामगार दिवसही उत्साह-ाने साजरा करण्यात येतो. आज ह्या महाराष्ट्र दिवसाच्या निमित्ताने यु.ई.एस.स्कूल ॲण्ड कॉलेजमधील सरस्वती मंडपात विद्यार्थी, शिक्षक व पालकगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यासपीठावर यु.ई.एस.संस्थेचे उपाध्यक्ष श्री. मिलिंद पाडगावकर, सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या तसेच पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील सुपरवायझर उपस्थित होत्या.

# एनएस सिजन क्रिकेट कॅडेमी तर्फे महिला समर कॅम्पचा माणगांवात शुभारंभ

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



माणगांव मधिल नयन शिंदे क्रिकेट कॅडेमी तर्फे मुलींना लेदर बॉल सिजन क्रिकेट खेळण्याची सुवर्ण संधी उपलब्ध झाली असुन महिला क्रिकेट मध्ये मुलींना येणारे काळात नाव लौकीक कमाविण्यास चांगले भविष्य आहे. यंदाच्या या मोसमात कॅडेमी तर्फे महिला क्रिकेट समर व्हेकेशन कॅम्प (शिबीर) आयोजीत करण्यात आले आहे. या कॅम्पचा रविवार दि. १ मे रोजी सकाळी ०९.३० वाजता मोर्बा रोड धनसे क्रिकेट मैदानावर छोटेखानी शानदार शुभारंभ माणगांव नगर पंचायतच्या महिला बाल कल्याण व युवक कल्याण उपसभापती नंदिनी नितीन बामगुडे आणि स्वच्छता व आरोग्य व क्रिडा समिती सभापती अजित चंद्रकांत तार्लेकर यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवुन तसेच नंदिनी बामगुडे यांच्या हस्ते फित कापून समर क्रिकेट कॅम्पचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी पहिली ते पाचव्या इयत्तेतील लहान मुली सिझन क्रिकेटचे आवडीने प्रशिक्षण घेत असल्याचे पाहुन कौतुक व्यक्त झाले. कॅम्प मधिल प्रशिक्षणार्थींच्या दोन गटात होणाऱ्या आजच्या सामन्याची नाणे फेक पाहुण्यांच्या हस्ते करुन शानदार सुरुवात झाली. याप्रसंगी नंदिनी बामुगडे यांनी आपले मनोगत व्यक्त करीत प्रशिक्षणार्थी क्रिकेटपटूना त्यांचे उज्वल क्रिकेट कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. तसेच मेहनत व चिकाटी च्या बळावर आपणास कसे चांगले यश प्राप्त करता येते हे आपल्या राजकारणातील नगरसेवक पदा पर्यंत पोहचण्या साठीच्या पंधरा वर्षाच्या मेहनतीचे अनुभव स्वच्छता व आरोग्य व क्रिडा सभापती अजित तार्लेकर यांनी खेळाडुंना सांगत, तुम्ही सुध्दा जिद्दीने क्रिकेट खेळात यशस्वी व्हा! अशा शुभेच्छा दिल्या. तसेच क्रिकेट प्रेमी भारत ढाकवळ याने आपल्या ग्रामिण भागात क्रिडा क्षेत्राकडे आपल्या लोकप्रतिनीधीं कडुन अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त केली.

गेली काही वर्ष नयन शिंदे क्रिकेट कॅडेमीचे प्रमुख प्रशिक्षक नयन शिंदे यांनी आपल्या कॅडेमीतील आर्यन पानवकर या गुणवंत क्रिकेट पटूने भारतिय क्रिकेट कॅप्टन कर्नल दिलीप वेंगसरकर यांच्या क्रिकेट कॅडेमी पर्यंत कशी मजल मारली आहे, ह्याची माहीती दिली. गेले दोन वर्ष या कॅडेमी तर्फे मुंबई, बंगलोर, कर्नाटक यांच्या मधिल सामन्यांचे आयोजन करुन आपल्या ग्रामिण भागातील खेळाडुंना एक चांगले व्यासपीठ व प्रेरणा देण्याचे कार्य नयन शिंदे करीत आहेत. आजच्या कार्यक्रमास क्रिकेट प्रशिक्षणार्थी मुली मुल व त्यांचे पालक आवर्जुन उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी शेतीसाठी नियोजन करून पाण्याचा योग्य वापर करावा : पूजा मेखले

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



शासनाच्या शेतीविषयक पाणी अडवा पाणी जिरवा मोहिमेला राज्यात चांगला प्रतिसाद मिळत असून शेतकऱ्यांनी पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून साचून ठेवले पाहिजे व त्याचा योग्य जपून वापर केला पाहिजे. याबरोबरच शेतात ठिबक सिंचन, तुषार सिंचन चा वापर केल्यास पाण्याची चांगल्याप्रकारे बचत होईल. असे प्रतिपादन मुरुड तालुक्यातील नांदगावमध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ कॅम्पस सांगली मार्फत नूतन नर्सिंग स्कूलमध्ये आयोजित शेतीतील पाणी व्यवस्थापन विषयक आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत समाज कार्याच्या विद्यार्थीनी पूजा मेखले यांनी केले.

शेतातील पाणी व्यवस्थापन व पाण्याचे महत्त्व या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख व्याख्याते सुग्रीव चव्हाण, प्रमुख पाहुणे ग्रामीण रुग्णालयातील समुपदेशक सचीन जाधव, आनंद तोंडले-पाटील,शालिकराव पावरा, नूतन नर्सिंग स्कूलच्या उपप्राचार्या प्राजक्ता सुर्वे, शिक्षक वृंद,गुरुपाद नाईक, मयुरी पुलेकर, सर्व कर्मचारी उपस्थित यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून यावेळी नर्सिंग स्कूलमधील विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पेरवे तर उपप्राचार्या प्राजक्ता सुर्वे यांनी आभार मानले.

# रोह्यात गुरे चोरणाऱ्या टोळीला नागरिकांच्या सतर्कतेमुळे रंगेहाथ पकडले

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रायगडमधे विविध तालुक्यात गुरे चोरण्याच्या घटना सुरु असताना रोह्यातही गुरे चोरणाऱ्या टोळीने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. रोह्यातील नागरिकांच्या सतर्कतेमुळे काल एका टोळीला गुरे चोरताना रंगेहाथ पकडण्यात आल्याने सर्वत्र खल खळबळ उडाली आहे.

रोहा पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,रोहा तालुक्यातील गौळवाडी गावच्या हद्दीत जंगल भागात एम एच ०६ ए जी. ६१३८ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडी मध्ये गुरांना निर्दयतेने कोंबून पळवून नेण्यात येत असल्याची फिर्याद रूपेश गजानन रेणोसे, रा.वराठी यांनी रोहा पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलीसांनी नागरिकांच्या सतर्कतेमुळे सदरच्या पिकअप गाडीसह त्यामध्ये कोंबून भरलेल्या तीन गायींना ताब्यात घेऊन आरोपी सचिन बाळकृष्ण शिगरूत (रा. गौळवाडी-रोहा), दानिश इस्माईल लद्दू, ताबिश इस्माईल लद्दू, नादीश इस्माईल लद्दू (सर्व रा. खालचा मोहल्ला, अष्टमी-रोहा) यांच्या विरूद्ध भा.द.वि. कलम ३७९,३४, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १०६० चे कलम ११, महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ चे कलम ५(अ),९, मोटार वाहन कायदा कलम ६६/१९२ ८३/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यानच्या घटनेबाबत रोह्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. हिवरकर हे पुढील तपास करीत आहेत.मात्र सध्या उष्माघाताचे प्रमाण अधिक वाढत असताना पाण्यासाठी व्याकूळ झालेली गुरे इतरस्त्र फिरत आहेत.त्यामुळे गुरे चोरणाऱ्या या टोल्यांवर लक्ष देणे गरजेचे झाले आहे असे सामान्य नागरिकांतून बोलले जात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पाच लाखांच्या विम्याचे संरक्षण देण्याकरिता केंद्राची मदत घेऊ : आ.संजय केळकर

पाच कोटी रुपयांचा निधी बेकायदेशीररित्या पेण अर्बन मध्ये ठेवला होता. त्यामुळेच पेण शहराचा विकास रोखला गेला होता असा आरोपही यावेळी भाजप आमदार रवीशेठ पाटील यांनी केला.

ठेवीदारांचे कष्टाचे पैसे मिळवून देण्याकरिता लाँग मार्च व रस्त्यासह न्यायालयीन लढाई संघर्ष समितीच्या माध्यमातून मागील बारा वर्ष सुरू ठेवल्याची माहिती संघर्ष समितीचे अध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी दिली. बँकेच्या ठेवीदारांना काही प्रमाणात पैसे मिळाले खरे परंतु सर्वसामान्य ठेवीदारांना आजही पूर्णतः न्याय मिळाला नाही. कोणतेही राजकारण न करता ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन लढा अधिक तीव्र करू या असे आवाहन संघर्ष समितीचे अध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच अनेक ठेवीदारांनीही यावेळी आपल्या व्यथा मांडल्या.

## प्लास्टिक कचऱ्यावर हुतामाकी कंपनीचा तोडगा

आले आहे. जपानस्थित या कंपनीने प्लास्टिक कचरा मुक्तीचा संदेश घेऊन कामास सुरुवात केली आहे. प्रायोगिक तत्त्वावर एका प्लांट चे उद्घाटन करण्यात आले असून त्यामध्ये महिन्याला ५५ ते ६० टन प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे.प्लास्टिक कचरा मुक्तीचा संदेश घेऊन कंपनीने प्लांटसाठी फेब्रुवारी २०२१ मध्ये खोपोली रानसई येथे भूमिपूजन केले होते.

मार्च २०२२ मध्ये पहिली ट्रायल घेण्यात आली तर पूर्णपणे प्लांट कार्यान्वित झाल्यानंतर आज त्याचे कंपनीचे अध्यक्ष मार्को बिल्टी, आदीच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

प्लास्टिक कचरा धुवून, साफ करून, त्यावर प्रक्रिया करून त्यातून वस्तू बनवल्या जातात, यापेक्षा मोठा प्लांट करण्याचा मानस असल्याचे यावेळी सस्थेचे सुनील भागवत यांनी सांगितले. याठिकाणी पाण्याचा पुनर्वापर केला जातो त्यासाठी फिल्टर व nbp प्लांट लावले गेले असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्था, स्थानिक सामाजिक संस्था यांची मदत घेऊन प्लास्टिक कचरा संपवण्याचे उदिष्ट असल्याचे भागवत यांनी सांगतानाच नागरिकांनी घरीच कचरा वेगळा करावा जेणेकरून तो प्रक्रिया करायला सोपा पडेल तरच आपण कचऱ्याच्या समस्येवर कायस्वरूपी उपाययोजना करू शकू असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. यावेळी कंपनीचे अध्यक्ष मार्को हिल्टी, मुरली, शिवरामन, थॉमस, सुनील भागवत आदी उपस्थित होते.

## राणा दाम्पत्याचा तुरुंगातील मुक्काम वाढला

दरम्यान, नवनीत राणा यांनी आपल्या वकिलांकरवी भायखळा कारागृह अधीक्षकांना एक पत्र लिहिलं आहे. त्यात स्पॉन्डीलायटिसच्या त्रासाबाबत अवगत केले आहे. ' कोठडीत सतत लादीवर बसावं लागत असल्याने माझं दुखणं वाढलं आहे. २७ एप्रिल रोजी मला जे. जे. रुग्णालयात नेण्यात आले असता सिटीस्कॅन करण्याची आवश्यकता असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले होते. मात्र, डॉक्टरांच्या सल्लयाकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे आजारपण वाढल्यास त्याला पूर्णपणे कारागृह प्रशासन जबाबदार असेल ', असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## अत्याचारप्रकरणी आरोपीला मरेपर्यंत कारावासाची शिक्षा

मुलीची साक्ष व वैद्यकीय पुरावा महत्वाचा ठरला. या खटल्यामध्ये अतिरिक्त शासकीय अभियोक्ता तथा सहायक सरकारी वकील ॲड.योगेश तेंडूलकर यांनी सरकार पक्षाचे काम पाहिले आणि अतिशय महत्वाचे न्यायनिर्णय सादर केले. सदर खटल्याचे पैरवी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरिक्षक यु.एल.धुमास्कर यांनी काम पाहिले.महिला पोलीस हवालदार छाया कोपनर, हवालदार शशिकांत कासार व हवालदार शशिकांत गोविलकर, पोलीस शिपाई सुनील गोळे आणि सोमनाथ ढाकणे यांनी सहकार्य केले.

या खटल्यात विशेष व सत्र न्यायाधिश पी.पी.बनकर यांनी घटनेतील गुन्ह्याच्या शाबितीनंतर आरोपी यास दि. २ मे २०२२ रोजी सर्व कलमान्वये दोषी ठरवून मरेपर्यंत कारावासासह १० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. पोलादपूर तालुक्यात गेल्या चार-सहा वर्षांमध्ये पोक्सो गुन्ह्यांची संख्या चिंताजनक असून माणगांव येथील विशेष व सत्र न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर सध्या जामिनावर असलेल्या पोक्सो गुन्ह्यातील आरोपींचे धाबे दणाणले आहेत.

## 'उत्सव महाराष्ट्राचा संस्कृती महाराष्ट्राची' कार्यक्रम संपन्न

अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रायगड जिल्हा समालोचक अध्यक्ष संदीप पाटील, रवींद्र भोईर, मुख्याध्यापक बबन काटकर, संदीप मोर, सचिन पाटील, ठाणे महानगर पालिका उपअभियंता अविनाश आव्हाड, युवा नेता मुकेश बाळूंग, डॉ. सुमन मिश्रा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## विना परवाना वाहतुकीवर वन विभागाची कारवाई

मार्गदर्शनखाली व अतिरिक्त कार्यभार वनक्षेत्रपाल संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन रोहा राकेश साहू यांच्या आदेशावरून फिरते पथक स्टाफ यांनी ही कारवाई केली आहे. वनक्षेत्रपाल माणगाव प्रदीप पाटील, रोहा वनपाल फिरते पथकाचे वैभव शिंदे, राजेशकुमार पाटील, रोहा वनरक्षक फिरते पथकाचे अजिंक्य कदम, पोपट करांडे,माणगाव वनपाल राजेश गायकवाड व राऊंड स्टाफ माणगाव यांनी ही कामगिरी बजावली आहे.दरम्यान घटनेबाबत अधिक तपास सुरू आहे.

## ग्रामपंचायत शिरवली

ता.पनवेल, जि.रायगड

**जाहीर सूचना**

दि.०२/०५/२०२२

ग्रामपंचायत शिरवली, ता.पनवेल, जि.रायगड १५ वा वित्त आयोगातून विविध विकास कामाच्या अंमलबजावणीकरिता सिलबंद निविदा मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | तरतूद रक्कम | इसारा रक्कम (नापरतावा रक्कम) | निविदा रक्कम | निविदा स्वीकारण्याची तारीख | निविदा उघडण्याचा दिनांक | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महोदर वस्ती ठाकूरवाडी येथील तुकाराम तांबडे व चंद्रकांत भगत घरापर्यंत रस्ता करणे | २७५३४५ | २७५३ | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |
| २ | वांगणी त.त.येथील साईबाबा मंदिर ते बबन भगत घरापर्यंत अंतर्गत रस्ता करणे | १५०००० | १५०० | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |
| ३ | कोंडप येथे अंतर्गत सिमेंट रस्ता करणे | १५०००० | १५०० | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |
| ४ | पाले ठाकूरवाडी येथील शनिवार कांबडी ते गोमा बांगारी अंतर्गत गटारे करणे | २४५३८३ | २४५४ | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |
| ५ | महोदर ठाकूरवाडी येथील समाजमंदिर ते काशिनाथ पारधी घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १५०००० | १५०० | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |
| ६ | भल्याची वाडी येथील शांताराम पारधी ते अंबो भगत घरापर्यंत अंतर्गत सिमेंट रस्ता करणे | १५०००० | १५०० | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |
| ७ | शिरवली येथील किराणा दुकान ते गणाबुवा पाटील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | २५८४४२ | २५८४ | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |
| ८ | चिंचवली शाळा वॉल कंपाऊंड करणे | ५०००० | ५०० | १०० | ०४/०५/२०२२ ते १०/५/२०२२ | ११/०५/२०२२ | |

अटी व शर्ती :-

१) निविदा मिळणेकरिता दि.०४/०५/२०२२ ते १०/०५/२०२२ रोजी दुपारी ठिक ५.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज सादर करणे

२) भरलेल्या सिलबंद निविदा दि.१०/०५/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

३) आलेल्या निविदा दि.११/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील.

४) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.

५) निविदा पोस्टाने दि.१०/०५/२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

६) सदर जाहिरातीमधील मागविण्यात आलेल्या साहित्याचे, दुरुस्तीचे, उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.

७) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.

८) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत बिलातून केली जाईल व नियमाप्रमाणे जीएसटी, टॅक्स व इतर करकपात करण्यात येतील.

९) वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.

१०) उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.

११) निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक आहे.

१२) मंजूर काम पनवेल विग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.

१३) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन्ही जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.

१४) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, वस्तूचा / कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१५) काम पूर्ण करणे पुर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.

१६) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.

१७) निविदा धारकाकडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

१८) अंदाजपत्रकीय दरापेक्षा दाराची निविदा अस्वीकृत राहील.

१९) मंजूर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरुन वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.

२०) कमीत कमी दराची निविदा मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

२१) एक किंवा सर्व निविदा नामंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत शिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत शिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वदप येथील रक्दान शिबिरात ८२ रक्तदात्यांचे रक्तदान



**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कर्जत तालुक्यातील वदप येथील नेताजी संघ वदप कुशिवली, ग्रामस्थ मंडळ वदप – कुशिवली, जय हनुमान सेवा मंडळ वदप, दोस्ती ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने समर्पण ब्लड बँक घाटकोपरच्या सहकार्याने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ८२ रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मंडळांच्या सदस्यांनी केवळ खेळा पुरतेच आम्ही मर्यादित नसून सामाजिक भानही आम्ही जपतो हे दाखवून दिले आहे. वदप गावातील मारुती मंदिराच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सरपंच निरा विचारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी उपसरपंच लीलाधर गायकवाड, सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, समीर येरूणकर, अजित पाटील, कैलास पोटे, आत्माराम गायकवाड आदी उपस्थित होते. कोठारी यांनी रक्तदानाचे महत्व सांगितले. सर्वप्रथम ॲड. योगेश देशमुख यांनी रक्तदान करून रक्तदानाचा प्रारंभ केला. समर्पण ब्लड बँकेच्या डॉ. फरीन खान यांच्या मार्गदर्शनाखाली धनश्री साळवी, हर्षद साळवी, धीरज गुप्ता, लता देशक, अनुराधा वायदंडे, सिद्धेश तांबे आदींनी रक्त संकलनाचे काम केले.

## लाकडी बांबूने एका इसमास मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लाकडी बांबूने एका इसमास मारहाण केल्याची घटना कोपरा पुलाच्या इथे घडली आहे. खारघर सेक्टर १४मध्ये राहणारे ब्रम्हानंद तिवारी हे सायन–पनवेल रोडवर कोपरा पुलाखालून त्यांच्या गाडीने कार्यालयात जात असताना एका तरुणाने त्यांची गाडी थांबवून त्यांना लाकडी बांबूने मारहाण केली आहे. यात त्यांना मनगटाजवळ दुखापत झाली आहे.

# परमात्म्याच्या बोधाने मनातील समस्त भ्रम दूर होतात : सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**



परमात्म्याचा बोध प्राप्त झाल्यास मनातील समस्त भ्रम दूर होतात आणि त्याच्याशी प्रेम केल्याने खऱ्या भक्तीला सुरवात होते व जीवन आनंदमय होऊन जाते. असे आनंदी जीवन प्राप्त झालेला मनुष्य तो अलौकिक आनंद स्वत:पर्यंत सीमित न ठेवता प्रत्येकाला वाटण्याचा प्रयत्न करत असतो. असे उद्गार निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी रविवार, दिनांक १ मे, २०२२ रोजी खारघर, नवी मुंबई येथील सेंट्रल पार्क नजिक असलेल्या सिडको मैदानावर विशाल रूपात आयोजित केलेल्या एक दिवसीय निरंकारी संत समागमामध्ये व्यक्त केले. या कार्यक्रमामध्ये संपूर्ण मुंबई महानगर प्रदेश आणि आसपासच्या जिल्ह्यांतील हजारों निरंकारी भक्तगण सहभागी झाले आणि त्यांनी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य दर्शनाबरोबरच त्यांच्या अमृतमय प्रवचनाचा आनंद प्राप्त केला.

सद्गुरु माताजींनी सांगितले की, या जगामध्ये मनुष्य जन्मात आल्यानंतर परमात्म्याला जाणून स्वत:ची ओळख करुन घेणे हा वास्तविक जीवन उद्देश आहे. जेव्हा आपल्याला परमात्म्याची ओळख होते तेव्हा आमचे मन सहजच त्याच्याशी अनुसंधान साधते आणि मनामध्ये परिवर्तन घडून येते. ही प्रक्रिया अगदी सहजपणे घडते, त्यासाठी कोणताही वेगळा प्रयास करावा लागत नाही. खरं तर कोणतेही अन्य सायास अथवा प्रयास करुन मनामध्ये परिवर्तन घडून येणे शक्यदेखील नाही.

सद्गुरु माताजींनी पुढे प्रतिपादन केले, की परमात्माचे दर्शन घेतल्यानंतर त्याची निरंतर जाणीव ठेवल्याने मनामध्ये मानवी गुण उत्पन्न होतात. मन निर्मळ होते आणि त्याचा आप–पर भाव निघून जातो. कोणाबद्दल मनात वाईट विचार येत नाहीत. असे जीवन जगणारा मनुष्य संतत्वाने युक्त होतो आणि इतरांसाठी प्रेरणास्रोत बनून जातो.

सत्गुरू माताजींनी पुढे सांगितले, की जेव्हा आम्ही स्वत:ला सावरतो तेव्हा जग आपोआपच सुधारत जाते. आवश्यकता इतकीच आहे, की सावरण्याची किंवा सुधरण्याची सुरुवात आपण स्वत:पासून करावी. याउलट कोणी दूसरा चूक करत आहे ती पाहून आपणही चूक करणे उचित नाही. वास्तविक पाहता परमात्म्या समवेत प्रत्येकाचे व्यक्तिगत नाते असते. भक्ती हा प्रत्येकाचा स्वतंत्र प्रवास आहे. दुसऱ्याची नक्कल करुन आपल्याला आनंदाची अवस्था प्राप्त होऊ शकत नाही.

त्यासाठी आपण स्वत:चे अंत:करण या परमात्म्याशी जोडायवे लागेल. त्यानंतरच वास्तविक आनंदाची अनुभूती प्राप्त होईल.

शेवटी, सद्गुरु माताजी म्हणाल्या, की जशा प्रकारे प्रकाशाचे आगमन होताच अंधार दूर होतो तशाच प्रकारे मनामध्ये परमात्म्याच्या ज्ञानाचा उजेड आल्योबरोबर अज्ञानरुपी अंधार नाहीसा होतो. मग हे मन अहंकारापासून मुक्त होते आणि त्यामध्ये सकारात्मक विचार प्रवेश करतात.

या संत समागमामध्ये सर्व भाविक–भक्तगणांनी कोरोना कालखंडानंतर प्रथमच सद्गुरुचे साकार रुपात दिव्य दर्शन प्राप्त केले ज्याची प्रतीक्षा ते बऱ्याच कालावधीपासून करत होते. सद्गुरुचे दिव्य दर्शन प्राप्त झाल्याने सर्वांच्या ह्रदयात कृतार्थ झाल्याची आणि सद्गुरुच्या प्रति कृतज्ञता प्रकट करणारी भावना होती.

# मराठा समाज भवनाच्या पहिल्या मजल्याच्या कामाचा शुभारंभ

## मा.आ.धैर्यशील पाटील यांच्या हस्ते पूजन



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील मराठा समाज भवनाच्या तळमजल्याचे काम नुकतेच पूर्ण झाले. त्यानंतर हे समाज मंदिर सामाजिक, धार्मिक अश्या विविध कार्यक्रमांसाठी सुरू करण्यात आले आहे. यावेळी नियोजित समाज मंदिराच्या पहिल्या मजल्याच्या कामाचा शुभारंभ माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सकल मराठा समाज रायगड जिल्हा अध्यक्ष विनोद साबळे, सुधागड तालुकाध्यक्ष गणपत सितापराव, रोहा तालुका मराठा अध्यक्ष प्रदीप देशमुख, खा–लापूर तालुकाध्यक्ष शशिकांत मोरे, खोपो–लीचे माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब जाधव, पेण नगरपालिकेचे नगरसेवक राजू वारकर, शेकाप युवा नेते मंगेश दळवी, पेण तालुका मराठा समाजाचे अध्यक्ष प्रदीप चव्हाण, पेण शहर अध्यक्ष प्रवीण बैकर आदींसह विशाल साजेकर, पी.टी.शिंदे, मयूर सावळे, शिवाजी मोरे, नाना पवार, सागर पवार, श्रीकांत जाधव, सचिन पवार, कमलाकर साळुंके, मनीष देशमुख, संतोष सावंत, विजय कदम, दशरथ एरूनकर, सुभाष टेम्बे, साळवी सर आदींसह पेण तालुक्यातील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून मराठा सामाजिक सांस्कृतिक विकास मंडळ पेण यांच्या वतीने श्री सत्यनारायण महा पूजेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध कार्यक्रम पार पडले. दुपारी स्वर अभिलाषा म्युझिकल यांचा भजन त्यानंतर महाप्रसाद तर संध्याकाळी ग्रामस्थ मंडळ धावटे यांचा सुश्राव्य असा हरिपाठ संपन्न झाला.

# गावदेवीच्या यात्रेनिमित्त तलावात सामुहिक मासेमारी



**दै.रायगड नगरी । उरण**

गाव देवी देवतांची यात्रा म्हणजे गावातील जनतेच्या आनंदाला उधाण रायगड जिल्ह्यात यात्रे निमित्त घरोघरी खास बेत केला जातो. यात्रेला आमंत्रित केलेल्या पाहुण्यांसाठी मटणाच्या जेवणाबरोबर मासळीचा खमंग बेतही आखला जातो आणि ही मासळी विशेष करून गावच्या तलावातूनच असते.

काल यात्रा असल्याने उरण तालुक्यातील कळंबूसरे येथे बापूजिदेव यात्रे निम्मित सामूहिक मासेमारी करण्यात आली आहे. सामूहिक मासेमारीची परंपरा वर्षानुवर्षे पासून या गावांमध्ये अजूनही टिकून ठेवलेली आहे. आदल्या दिवशी गावामध्ये दवंडी मारून गावकऱ्यांना सूचित केले जाऊन दुसऱ्या दिवशी गावकरी एकत्रित येऊन सामूहिक मासेमारी केली जात आहे. पहिल्या पावसाळ्यात म्हणजे जून महिन्यात गावच्या तलावात गावकी तर्फे छोटे मासे सोडविले जातात. माशांना मोठे होण्यासाठी पोषक असे खाद्य ही टाकले जाते. साधारणपणे नऊ ते दहा महिन्यात म्हणजे गावदेवी देवतांच्या यात्रे पर्यत हे मासे मोठे झालेले असतात. या माशांमध्ये, चिलापी, कटला, जिताडा आदी मासळीचा समावेश असतो. यात्रेच्या दिवशी गावामध्ये दवंडी मारल्याप्रमाणे सकाळी लवकर गावातील लोक तलावाजवळ एकत्र होतात. तर तलावात मासे पकडण्याचे जाळे म्हणजे आसू घेऊन तलावात उतरतात यामध्ये मोठ्या मोठी जाळे म्हणजे आसू प्रत्यकाचे असते. यालाच तळा मारणे म्हणतात.

# दाऊदी बोहरा समाजाच्या कब्रस्थानसाठी आमदार फंडातून दहा लाख रुपयांचा निधी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

दाऊदी बोहरा समाजाच्या इफ्तार पार्टीच्या प्रसंगी मुद्रे खुर्द मध्ये असलेल्या कब्रस्थानसाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी दहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा शब्द दिला.

कर्जत शहरातील दाऊदी बोहरा समाजाच्या प्रार्थना स्थळामध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. प्रार्थना स्थळाचे प्रमुख मुल्ला याह्याजी करीम यांनी आमदार महेंद्र थोरवे यांचे स्वागत केले. याप्रसंगी नगरसेवक संकेत भासे उपस्थित होते. शेख हुनेद यांनी प्रस्तविक केले. यावेळी बोलताना आमदार थोरवे यांनी, 'मी पहिल्यांदाच या ठिकाणी आलो आहे. आपला समाज म्हणजे एकदम नम्र स्वभावाचा समाज. आपण कब्रस्थानसाठी निधी मिळावा अशी मागणी केली होती म्हणून रमजानच्या या पवित्र महिन्याच्या दिवशी आपल्या कब्रस्थानसाठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देत असून अजूनही कोणत्याही कामासाठी निधी लागल्यास हक्काने मला सांगा.' असे स्पष्ट केले. हुसैन जमाली यांनी आभार प्रदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

याप्रसंगी झुलकरनैन डाभिया, मुल्ला मुर्तझा, अलिभाई धरिवाला,मुस्तफा धरिवाला,शब्बीर धरीवाला, ताहेर कर्जतवाला, मन्सूर बोहरी, शब्बीर कर्जतवाला यांच्यासह जमात कमिटी, दाना कमिटी, एफएमबी कमिटीचे सदस्य उपस्थित होते.



# पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ६० ते ६५ वर्षे, रंग काळा, उंची सुमारे ४.५ फूट, चेहरा उभट, सडपातळ बांधा, डोके व दाढीवरील केस पांढरे साधारण वाढलेले, नाक सरळ असून अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व राखाडी रंगाची ट्रॅकपँट परिधान केलेली आहे.

---

राव सो कोर्ट

प्रो.जमा.६–२५

**अर्जदाराचे वकील**
**कु.दिपाली रामदास गावंड**
**वकील उच्च न्यायालय**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज ६७१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०६/२०२२

**१) श्रीमती.गंगाबाई बाबुराव सुरते**
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) सा.अनिता दिलखुश नाईक**
**पुर्वाश्रमीची कु.अनिता बाबुराव सुरते**
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
दोघीही रा.फ्लॅट नं.१०१, गायत्री आवास, प्लॉट नं.१३०, सेक्टर आर ५, वडघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी **कै.बाबुराव शांताराम सुरते** हे दि.१४/१०/२०२१ रोजी लिलावती हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, बांद्रा–मुंबई येथे मयत झाले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे (वाघिवली वाडा), ता.पनवेल,**
**जि.रायड येथील युनिट केस नं.६३**

| अ.क्र. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र–हे.आर.पॉ. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओवळे | ८० | ३ | ०–१२–१ | १२१० |
| २ | ओवळे | ११६ | ४ | ०–०४–५ | ४५० |
| ३ | ओवळे | ११६ | १० | ०–२३–६ | २३६० |
| ४ | ओवळे | १२३ | ६ | ०–०२–८ | २८० |
| ५ | ओवळे | १२३ | १० | ०–०५–१ | ५१० |
| ६ | ओवळे | १२६ | ६ | ०–०६–८ | ६८० |

**कै.बाबुराव शांताराम सुरते** यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यनिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.एस.जी.राणे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

प्रोबेट चौकशी प्रोबेट अर्ज क्र.४८३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/०६/२०२२

**१) सौ.अरुणा अशोक पाटील**
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
**२) सौ.भारती विजय पाटील**
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
**३) सौ.मनिषा कृष्णा पाटील**
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.पाटील पोल्ट्री फार्म, मुंबई गोवा हायवे, पळस्पे फाटा, पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२२१ — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार यांचे सासरे **कै.श्रीरंग सखाराम पाटील** यांचा मृत्यू दि.१६/०५/२०२१ रोजी, पाटील पोल्ट्री फार्म, मुंबई गोवा हायवे, पळस्पे फाटा, पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२२१ येथे झालेला असून त्यांना अर्जदार **क्र.१) सौ.अरुणा अशोक पाटील, क्र.२) सौ.भारती विजय पाटील, क्र.३) सौ.मनिषा कृष्णा पाटील** ह्या सुना आहेत. **कै.श्रीरंग सखाराम पाटील** हे बिना अपत्य असल्यामुळे यांनी त्यांचे मृत्यूपूर्वी दि.११/०३/२०१६ रोजी रजिस्टर्ड मृत्यूपत्र करून ठेवलेले आहे व ते दोन साक्षीदारांच्या हजेरीत तयार केलेले असून विधीपूर्वक निष्पादन केलेले आहे. **कै.श्रीरंग सखाराम पाटील** यांनी त्यांची सख्खी भावंडे, त्यांच्या मुलांना, सुनांना व नातवंडांना संपत्तीचे वितरण केलेले आहे. सदरचे मृत्यूपत्र हे अर्जदार यांचे शेवटचे मृत्यूपत्र असून ते या अर्जासोबत अर्जदार यांनी जोडलेले आहे. त्यांचे मृत्यूपश्चात नमूद केलेल्या अन्य स्थावर व जंगम मिळकती बाबत अन्य वारसदारांना/लाभार्थींना बिना प्रोबेट सक्षम अधिकाऱ्यांनी वितरण केलेले आहे. मात्र मृत्यूपश्चात नमूद केलेल्या क्र.८ वरील बँक लॉकर पैकी, ॲक्सेस बँक, पनवेल येथील लॉकर बिना प्रोबेट उघडलेले आहे. परंतु बँक ऑफ महाराष्ट्र, पनवेल शाखेने त्यांचे कडील लॉकर उघडणेकरिता प्रोबेटची मागणी केल्यानुसार त्याअर्थी अर्जदार यांनी ते **कै.श्रीरंग सखाराम पाटील** यांनी केलेल्या मृत्यूपत्राबाबत अर्जदारांनी प्रोबेट दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**सदर मृत्यूपत्रातील नमूद मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**
**बँक ऑफ महाराष्ट्र, पनवेल शाखा येथील बंद लॉकर कै.श्रीरंग सखाराम पाटील हे मृत्यूपूर्वी धारण करीत होते.**

वर वर्णन केलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र, पनवेल शाखा येथील बंद लॉकर बाबत **कै.श्रीरंग सखाराम पाटील** यांनी आपल्या मृत्यूपूर्वी दि.११/०३/२०१६ रोजी रजिस्टर्ड मृत्यूपत्र करून ठेवलेले आहे व ते दोन साक्षीदारांच्या हजेरीत तयार केलेले असून विधीपूर्वक निष्पादीत केलेले आहे. तसेच सदरच्या बंद लॉकर मधील ऐवज **कै.श्रीरंग सखाराम पाटील** यांनी **सौ.अरुणा अशोक पाटील, सौ.भारती विजय पाटील व सौ.मनिषा श्रीकृष्ण पाटील** यांस मृत्यूपत्राद्वारे दिलेल्या आहेत.

वरील मिळकतींचा लाभ अर्जदार यांस मिळणेकरिता प्रोबेट मिळण्याकामी अर्जदार यांनी केलेला आहे. याबाबत कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत हजर सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदाराकडून कायदेशीर साक्षीपुरावे नोंदवून अर्जदारास प्रोबेट प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०२/०५/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

श्री.मुजावर सो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील : ॲड.शिवराज राणे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५४४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०६/२०२२

**कै.मीना विश्वास साळवे मयत तर्फे वारसदार**
**१) श्री.विश्वास काशिनाथ साळवे**
वय : ६० वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा.सदनिका क्र.अ–१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, भूखंड क्र.२८–३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर ६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
**२) श्री.सुशिल विश्वास साळवे**
वय : ३१ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी (वाहन चालक)
रा.सदनिका क्र.अ–१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, भूखंड क्र.२८–३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर ६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
**३) श्री.अनुराग विश्वास साळवे**
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सिद्धार्थ कॉलनी, बी.डी.गायकवाड प्लॉट, डॉ.धवल शहाच्या मागे, चेंबुर, मुंबई–४०००७१
**४) सौ.सोनम मनजीत जेठ (विवाहित मुलगी)**
**पुर्वाश्रमीची कु.सोनम विश्वास साळवे**
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.४, गल्ली नं.६ व ७ च्या जवळ, निवृत्ती कचरु अहिरे, प्लॉट नं.३७, सिद्धार्थ कॉलनी, के.एन.गायकवाड मार्ग, चेंबुर, मुंबई–४०००७१
**५) कु.दिपाली विश्वास साळवे**
वय : ३० वर्षे, धंदा : खाजगी नोकरी
रा.सदनिका क्र.अ–१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, भूखंड क्र.२८–३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर ६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै.मीना विश्वास साळवे** यांचा मृत्यू दि.०७/०६/२०१९ रोजी झाला. त्यांचे मृत्यूच्या पश्चात खालील वर्णन केलेल्या मिळकतीत त्यांच्या असलेल्या ५० टक्के हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता मे.पनवेल कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

१) **कै.मीना विश्वास साळवे** यांना त्यांच्या ५० टक्के हिश्श्यास असलेल्या मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणेचा आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.अ–१/१०२, (क्षेत्र ३४० चौ.फूट म्हणजेच ३१.५७ चौ.मी. बिल्टअप + ७७ चौ.फुट बाल्कनी) या आकारमानाची सदनिका क्र.अ–१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, या ठिकाणी स्थित आहे. भूखंड क्र.२८–३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर–६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**

अर्जदार हे **कै.मीना विश्वास साळवे** यांचे वरील मिळकती संबंधात कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्कांबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्कांबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार हे जर **कै.मीना विश्वास साळवे** यांच्या वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२/५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

Sonawane Saheb

Process Fee of rupees 50 paid

**Adv.Narendra Sharma**

## PUBLIC NOTICE

BEFORE THE HONOURABLE COURT OF CIVIL, JUDGE SENIOR DIVISION, RIAGAD AT PANVEL

CMA No.434/22
Exh : 8/D
Next Date : 15/06/2022

**1) MRS.LEELABAI DNYANESHWAR GAWADE** Applicant No.1
**2) MR.DNYANESHWAR BABURAO GAWADE** Applicant No.2
**3) MR.SUNIL DNYANESHWAR GAWADE** Applicant No.3

NOTICE is hereby given to the public at large that:

1) That, Late. **MR.ANIL DNYANESHWAR GAWADE,** died intestate on 01.01.2017 at Taloja and is survived by his Mother MRS.LEELABAI DNYANESHWAR GAWADE, Applicant No.1, Father i.e.applicant no. 2 and Brother i.e.Applicant no.3 respectively, herein are his sole surviving kith and kin of Late **MR.ANIL DNYANESHWAR GAWADE,** Further **MR.ANIL DNYANESHWAR GAWADE** was unmarried, At the time of Late **MR.ANIL DNYANESHWAR GAWADE**'s demise, he was residing with the applicants 1 at : Flat no A/104, Laxmi Complex, Plot no 1 and 2, Sector-5, Taloja Panchnand Phase-1, Taloja Majkur, Raigarh, Maharashtra.

2) Applicants have filed for the Heirship certificate of late **MR.ANIL DNYANESHWAR GAWADE,** who died intestate on 1 st January 2017 at Panvel Navi Mumbai before the Civil Judge Senior Division at Panvel.

1) That the subject matter and movable property of the deceased is mentioned as follows.

**SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY**

1/3 rd Share of Flat No.A-104 admeasuring 34.887 Sq.Mt. Carpet Area, on 1 st Floor, in Building No.A, Laxmi Complex situated at the village-Taloja-Panchnand, Bearing Plot No.1 and 2, Sector No.5, Taluka Panvel, District-Raigad, Maharashtra.

ALL PERSONS other than applicants having any claim against, in, to or upon the above said property or having any objection with respect to the application for Heirship Certificate by way of inheritance agreement, contract, sale, mortgage, possession, gift, lease, lien, charge, trust, maintenance, easement or otherwise howsoever are hereby required to notify the same in writing along with the supporting documentary evidence in the Court of Civil Judge Senior Division (S.D.) Panvel, within 30 days from the date hereof otherwise it will be deemed that there is no objectic. for issue of the Heirship Certificate on the name of proposed applicant herein. It is to note that the objection reised after the completion of said period of 30 days will not be considered.

Sd/-
Jr. Clerk
Civil Court, Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superint.
Civil Court, Panvel

# संक्षिप्त...

## राजू सोनी यांच्या कार्याचा कुंभारवाडा युवक मंडळ पनवेल ने केले विशेष कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे कार्यसम्राट नगरसेवक राजू सोनी यांनी आता पर्यंत सामाजिक बांधिलकी जपत समाजाप्रती केलेल्या विविध कार्याची दखल कुंभारवाडा युवक मंडळ यांनी घेऊन त्यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार केला. यावेळी शिवसेना जिल्हासल्लागार रमेश गुडेकर हे व्यासपिठावर उपस्थित होते.

१ मे कामगार दिन व महाराष्ट्रदिनाच्या अवचित साधून कुंभार वाडा युवक मंडळा तर्फे सत्यनारायण पुजा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी तेथे नगरसेवक राजू सोनी यांचे सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी कुंभारवाडा युवक मंडळाचे अध्यक्ष रितेश पवार, खजिनदार राजेश परदेशी, सचिव रुपेश तळोजकर, परेश शेट्ये यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




## ३२ वर्षीय महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातुन ३२ वर्षीय महिला बेपत्ता झाल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे.

वैशाली सखाराम येजरे ही महिला सेंट थॉमस स्कुलजवळ, आकुर्ली येथून बेपत्ता झाली आहे. तिचा चेहरा उभट, रंग सावळा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे बारीक, अंगाने सडपातळ आहे. अंगात रिळया रंगाचे कुर्ती व लाल रंगाची पॅन्ट घातली असून उजवे कानात पिवळया धातुची रिंग आहे. ही महिला मानसीक रुग्ण असून तिला मराठी भाषा बोलता येते. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक उदय देसाई मो.न ९१३७२१९६३१ यांच्याशी संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# सिडकोच्या निवासी, निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांसह वाणिज्यिक गाळे विक्रीच्या योजनेकरिता अर्ज करण्यास मुदतवाढ

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या १५३ निवासी, १८ निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांसह २७५ वाणिज्यिक गाळे विक्रीच्या योजनेच्या ई-निविदा आणि ई-लिलाव प्रक्रियेस मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोतर्फे घेण्यात आला आहे. अक्षय्य तृतीया तसेच रमजान ईदच्या प्रसंगी नागरिकांना या सुवर्णसंधीचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेता यावा यासाठी सिडकोतर्फे सदर योजनांना मुदत वाढ देण्यात आली आहे.

या वर्षीच्या गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर महायोजने अंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील १५३ निवासी, १८ निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांसह २७५ वाणिज्यिक गाळे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या मुदतवाढीमुळे नागरिकांना योजनेकरिता अर्ज करण्यास पुरेसा अवधी देखील प्राप्त होणार आहे. या अनुषंगाने अनामत रक्कम भरणा, बंद निविदा सादर करणे, ई-लिलाव प्रक्रियांसही मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडको महामंडळातर्फे ०२ एप्रिल २०२२ रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर तीन स्वतंत्र योजनांतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील निवासी, निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांसह वाणिज्यिक गाळे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. नवी मुंबईतील ऐरोली, घणसोली, नेरूळ, खारघर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये खास बंगल्यांकरिता १५३ भूखंड उपलब्ध करून देण्यात आले होते.

नवी मुंबईतील ऐरोली, नेरूळ, खारघर, पनवेल आणि कळंबोली नोडमधील मोक्याच्या ठिकाणी निवासी तथा वाणिज्यिक वापराचे १८ भूखंड उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच नवी मुंबईच्या विविध नोडमधील सिडकोच्या प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पांतर्गत तसेच व्हॅलीशिल्प आणि स्वप्नपूर्ती गृहसंकुलांतील एकूण २७५ वाणिज्यिक गाळे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते.

१५३ निवासी वापराच्या भूखंडांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास ०६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास ०५ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस ६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तर योजनेचा निकाल ९ मे २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

१८ निवासी तथा वाणिज्यिक वापराच्या भूखंडांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास ६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास ५ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस ६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तर योजनेचा निकाल ९ मे २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

२७५ वाणिज्यिक गाळ्यांकरिता अर्ज सादर करण्यास व अनामत रक्कम भरण्यास १७ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बंद निविदा सादर करण्यास १६ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-लिलाव प्रक्रियेस १७ मे २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तर योजनेचा निकाल २० मे २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

सदर योजनांच्या सविस्तर माहितीकरिता अर्जदारांनी सिडकोच्या www.eauction.cidcoindia.com या संकेतस्थळास भेट द्यावी.

या महायोजनेमुळे सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबईसारख्या पायाभूत सुविधांनी परिपूर्ण शहरात आपला मनपसंत बंगला साकारण्याची संधी उपलब्ध झाली आहे तर विकासक आणि गुंतवणूकदारांना नवी मुंबईमध्ये निवासी किंवा वाणिज्यिक बांधकाम विकसित करण्याची संधी या योजनेद्वारे उपलब्ध झाली आहे. तसेच नवी मुंबईमध्ये सातत्याने वृद्धिंगत होणाऱ्या वाणिज्यिक संधींचा लाभ घेण्याची संधीदेखील व्यावसायिकांना मिळाली आहे. दिलेल्या मुदतवाढीचा फायदा घेऊन अधिकाधिक नागरिक, विकासक आणि व्यावसायिकांनी योजनेकरिता अर्ज करावेत आणि संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

> कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिक, विकासक आणि व्यावसायिकांना दिलासा मिळावा म्हणून भूखंड व वाणिज्यित गाळे विक्रीची महायोजना आणण्यात आली होती. या योजनेस मुदतवाढ दिल्याने अधिकाधिक नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. तसेच या सुवर्णसंधीमुळे नागरिकांचा येत्या अक्षय्य तृतीयेचा आणि रमजान ईदचा आनंदही द्विगुणीत होणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## माथेरानमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२ वा वर्धापनदिन १ मे महाराष्ट्र दिन मोठया उत्साहात आणि आनंदाने साजरा करण्यात आला. मे महाराष्ट्र दिन ,जागतिक कामगार दिन तसेच माथेरान नगरपरिषदेच्या स्थापनेला ११७ वर्षे पूर्ण झाली त्यामुळे या त्रिवेणी संगमाच्या निमित्ताने येथील नौरोजी उद्यानात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सकाळी आठ वाजता अधीक्षक कार्यालयात ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमानंतर ०८-१५ वाजता मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे यांच्या हस्ते नगरपरिषद कार्यालय येथे ध्वजारोहण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला नगरपरिषद नगर अभियंता स्वागत बिरंबले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण, वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला नगरपरिषदेचे लेखापाल अंकुश इचके यांच्या हस्ते पुष्पहार, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृती स्तंभास नगरपरिषदेचे पाणी पुरवठा, जलनिस:रण अभियंता अभिमन्यू येळवंडे यांच्या हस्ते पुष्पहार, हुतात्मा स्मारक येथे हुतात्मा भाई कोतवाल यांच्या प्रतिमेला स्नेहा साकळेकर यांच्या हस्ते पुष्पहार, हुतात्मा भाई कोतवाल स्मारक येथे स्वातंत्र्य सैनिकांच्या नामफलकास नगरपरिषदेच्या सहायक परिचारिका स्नेहा गोळे यांच्या हस्ते पुष्पहार आणि हुतात्मा स्मारक येथील हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या शिल्पास सुमन शिवते आणि मीनाक्षी डीगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सायंकाळी नौरोजी उद्यानात देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी सफाई कामगार कमल गायकवाड यांच्या प्रामाणिक पणाबद्दल त्यांचा विशेष सत्कार प्रशासक सुरेखा भणगे यांच्या हस्ते करण्यात आला तर सर्व कामगारांना सुद्धा कामगार दिनानिमित्त प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



## सर्पमित्र संदीप घरत यांनी दिले लॉगहेड जातीच्या कासवाला जीवदान

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड- खोरा बंदरात जेट्टीजवळ खडकाळ भागात रणरणत्या उन्हात अडकलेल्या लॉगहेड जातीचा समुद्री कासवाला सर्पमित्र संदीप घरत व सहकारी ऋषीकेश बैले यांनी समुद्रात सोडून जिवदान दिल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

आज सकाळच्या रणरणत्या उन्हात समुद्र किना-यावर जेट्टी जवळील खडकात अडकुन निपचित पडून राहिलेल्या कासवाच्या पाठीवर समुद्राचे पाणी घालून संदीप घरतने दिलासा दिला.

मुरूड शहरापासून १ कि.मी. अंतरावर असलेल्या खोरा बंदरात नेहमी प्रमाणे जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची वर्दळ सुरू होती. साधारण सकाळी ९ वाजता संदीप घरत व ऋषीकेश बैले हे खोरा बंदरात मासेमारी करीता गेले होते. त्यावेळी खोरा जेट्टीच्या खडकाळ भागात कासव दृष्टीस पडले. ते कासव जिवंत असल्याचे लक्षात आले. त्यावेळी तात्काळ संदीप घरत कासवाजवळ पोहोचले तर तो कासव रणरणत्या उन्हात तापून कोरडा झाला होता व असह्य होऊन निपचित पडला होता. त्यावेळी जवळ असलेले समुद्राचे पाणी कासवाच्या पाठीवर टाकल्याने त्याला दिलासा मिळाला व कासवाची हालचाल सुरु झाली. संदिप घरत यांनी त्याचवेळी त्याच परिसरात मासे पकडत असलेल्या त्यांचे मित्र ऋषीकेश बैले याला तात्काळ फोन करुन मदतीसाठी बोलावले. नंतर दोघांनी मिळून या ४० कि वजनाच्या कासवाला समुद्रात सुखरूप सोडून दिले.



## अजय मोहिते यांना विशिष्ट सेवा पोलीस पदक देवून महाराष्ट्र दिनी सन्मानित

**दै.रायगड नगरी । कर्जत**

सतत २९ वर्ष पोलीस दलात उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल आणि मागील पाच वर्षात चांगला तपास करून आरोपींना जेरबंद करण्यात यशस्वी झाल्याबद्दल कर्जत येथील अजय दत्ताराम मोहिते यांना विशिष्ट सेवा पोलीस पदक देवून महाराष्ट दिनी पालकमंत्री आणि पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते गौरविण्यात आले.



मूळचे कर्जत मधील रहिवासी आणि सध्या खालापूर पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले अजय दत्ताराम मोहिते यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल पोलीस पदक देवून गौरविण्यात आले. सतत २९ वर्ष पोलीस दलातील राज्य गुप्त वार्ता, लाच लुचपत विभाग, सायबर सेल, अलिबाग पोलीस ठाणे, खालापूर पोलीस ठाणे येथे चांगले काम करून आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.

राज्य गुप्त वार्ता विभागात काम करताना व्ही व्ही आय पी च्या दौऱ्या वेळी सुरक्षा विभागात सुरक्षेची जबाबदारी चांगली हा-ताळली होती तर सायबर सेल मध्ये अनेक गुन्ह्याची उकल करण्यात मदत केल्या प्रकरणी तसेच लाच लुचपत विभागात काम करताना अनेक लाच प्रकरणाच्या केसेस केल्या आणि गोपनीय माहिती चांगली हाताळली प्रकरणी अजय मोहिते यांना हे पोलीस विशेष पदक रायगड पालकमंत्री कु.आदिती तटकरे, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

## माझ्या लाल मातीतला खेळाडू हा माझ्या देशातल्या संघात खेळला पाहिजे : अनंत गीते

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मराठी माणसाने नेहमी आक्रमक राहिले पाहिजे. कबड्डी हा खेळ जिवंत ठेवायचे असेल तर जिव ओतून खेळा, जिव झोकून देऊन खेळा तरच माझ्या लाल मातीतला खेळाडू माझ्या देशाच्या संघात खेळेल असे मत माजी केंद्रीय अनंत गिते यांनी आंबेवाडी जिल्हापरिषद मतदार संघातील भगवा चषक कबड्डी स्पर्धेच्या उदघाट्न प्रसंगी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले कि या खेळामुळे नोकरीचा प्रश्न सोडविल. हा खेळ मातीतला असून हळू हळू या खे-ळाला शेलिब्रेटी उपस्थित राहिले जात आहेत.यामुळे हा खेळ आशिया स्थरासह अनेक देश खेळू लागले आहेत यामुळे हा खेळ ऑलिपिक मध्ये ही खेळला जाईल असे चित्र उभे राहिले आहे.परंतु हा खेळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गेल्या नंतर तो राष्ट्रीय संघात राहतो कि काय? अशी परिस्थिती निर्माण आहे आता हरियाणा, पंजाब,कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू या सर्व राज्यातील खेळाडू या संघात येऊ लागले असून यामुळे महाराष्ट्रातील कबड्डी खेळात खेळाडू मागे पडत आहेत. आपण त्या इरशेने खेळले पाहिजे यामुळे खेळात पहिल्या आशियन चॅनपियनशिप मध्ये सुवर्ण पदक मिळवले होते व त्यांचे कर्णधार कोकणातील अशोक शिंदे होते. मी चंद्रकांत लोखंडे आणि त्यांची टीम यांना धन्यवाद देईल त्यांनी आयोजित केलेल्या अशा स्पर्धेतून खेळाडू निर्माण होत असतात.

यावेळी आ. रविशेठ पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले कि खरे म्हणजे कबड्डी हा खेळ लोकप्रिय खेळ आहे. अशा प्रकारे कबड्डीचे आयोजन करून हे खेळाडू जिल्ह्यातून राज्यात, राज्यातून देशात असे निवडले जाऊ शकतात. यावेळी माजी केंद्रीय मंत्री अनंत गिते, आ.रविशेठ पाटील,आ. भरतशेठ गोगावले, आ.महेंद्र दळवी, अमित घाग, अनिल नवगणे रायगड जिल्हा प्रमुख, रमेश सुतार, रोहा तालुका प्रमुख समिर शेडगे, उप तालुका प्रमुख चंद्रकांत लोखंडे, राजेंद्र राऊत, अमरजी तेलंगे, कुलदीप सुतार, ज्ञानेश्वर खांमकर, मिलिंद पवार जेष्ठ नेते शंकरराव म्हसकर, शिवराम महाबळे, सरपंच समिर महाबळे, विष्णु मोरे,चेतना ताई लोखंडे, मनोहर महाबळे, ज्ञानेश्वर सुतार, अजय बाकाडे, गणेश शिंदे,आबा शिंदे,रमेश सानप, बबन म्हसकर, खांडेकर सर शिवसेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



## रमजान ईद, अक्षय तृतीया निमित्ताने म्हसळयात पोलिसांचे रूटमार्च

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

आज एकाच दिवशी साजरी होणारी मुस्लिम बांधवांची रमजान ईद आणि साडेतीन मुहूर्तातील हिंदू धर्मातील पवित्र दिवस अक्षय तृतीया हे सण, उत्सव गुण्यागोविंदाने, आंनदी आणि शांततापुर्ण वातातवरणात साजरे व्हावेत. कुठेही कायदा सुव्यवस्था निर्माण होऊ नये यासाठी आधीच खबरदारीचा उपाय म्हणून म्हसळा शहरात पोलिसांनी रूटमार्च काढुन दक्षता घेतली आहे. ईदच्या पूर्वसंध्येला म्हसळा पोलिसांनी काढलेल्या रूटमार्च मध्ये पोलीस निरीक्षक हेवाडे, स.पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, स.पोलिस निरीक्षक बांडे यांचे सह १३ पोलीस कर्मचारी,२ होमगार्ड सहभागी झाले होते. मोठ्या लोकवस्तीच्या म्हसळा शहरात सर्वधर्माचे लोक मिळुन मिसळून राहतात असे असले तरी सध्याचे स्थितीत महाराष्ट्रातील राजकीय वातावरण पाहाता तालुक्यासह शहरातील शांततेत कोणी मीठाचा खडा टाकु नये याची खबरदारी म्हणून शासन वेळोवेळी स्थानिक स्तरावर शांतता सभा, पोलीस संचालन करून काळजी घेत आहे.

## रोहा-अलिबाग रस्त्यावर मोटार सायकलच्या धडकेत २ जखमी

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोह्याकडून अलिबागकडे जाणारा खड्ड्यांचा रस्ता म्हणून परिचित असलेल्या या रस्त्यावर दोन मोटरसायकलच्य धडकेत दोघेही चालकाना गंभिर दुखापत झाली आहे.या धडकेत मोटर सायलकचेही किरकोळ नुकसान झाले असून या बाबत रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,रविवार दि.१ मे रोजी मच्छिंद्र रामा मोराळे(५८) वर्षे, रा.कोळीवाडा मेटपाडा ता,अलिबाग हे आपल्या मालकीची स्पेन्डर मोटार सायकल नं एम एच ०६ सी बी ६४६७ ही अलिबाग रोहा रोडने रोहा कडे जात होते.निडी गावचे हददीत निडी पुलाजवळ सायंकाळी ०५.४५ वा.आपल्या मोटर सायकल वरून आले असता रोहा बाजुकडुन अलिबागकडे जाणारे विजय अंतोष वाघमारे वय (१८)रा.मालसई आदीवासी वाडी ता.रोहा मोटारसायकल नं एम एच ०६ बी एक्स ३७७८ याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, अविचाराने चालवून रॉंन्ग साइडला येवून रोडचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून हयगयीने निष्काळजीपणे चालविल्याने अप-घात घडला.दरम्यान झालेल्या अपघातामध्ये समोरासमोर धडक बसल्याने दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे.


मे.पांडे साहेब यांच्या कोर्टात

**ॲड.शशिकांत आ. म्हात्रे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.५१३/२०२२

ने.ता.०९/०६/२०२२

**श्री.शांताराम पांडुरंग हुद्दार**
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.नांदगाव, पो.पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

**ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी**
ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची आजी **कै.गुणाबाई रामा भगत** दि.१५/०२/१९९६ रोजी मु.नांदगांव, पो.पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. वरील अर्जदार **श्री.शांताराम पांडुरंग हुद्दार** यांची आजी **कै.गुणाबाई रामा भगत** यांचे मृत्यू नोंदणी करण्यासाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीची कोणतीही हरकत न दाखविल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यू नोंद होवून मृत्यू दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०२/०५/२०२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**



### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७२/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.०४/०७/२०२२

**श्रीमती.क्रिपालीदेवी उर्फ कृपालीदेवी छोटेलाल कोरी वगैरे ३** — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार **श्रीमती.क्रिपालादेवी उर्फ कृपालीदेवी छोटेलाल कोरी श्री.कृष्णानंद, सा.कांचन, सौ.कनक (अर्जदार)** यांनी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात कै.छोटेलाल सुकाप्रसाद कोरी यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कै.छोटेलाल सुकाप्रसाद कोरी हे रा.ए-२०२, पंकज बिल्डींग, कमळ अपार्टमेंट, शंकर लेन, एस.व्ही.रोड, कांदिवली (प) मुंबई-४०००६७ येथे राहत होते. त्यांचे दि.२३/१०/२०१८ रोजी जसलोक हॉस्पिटल मुंबई येथे मयत झाले आहेत. त्यांना त्यांच्या मृत्यूपश्चात पुढील प्रमाणे वारस आहेत. श्रीमती.क्रिपालीदेवी उर्फ कृपाली श्रीमती.क्रिपालीदेवी उर्फ कृपालीदेवी, श्री.कृष्णानंद, सौ.कंचन, सौ.रंजन, सौ.कनक हेच वारस असून त्यांना वारस दाखला मिळणेकरिता मे.कोर्टात नमूदचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यांचे वडिलोपार्जित मयत कै. छोटेलाल सुकाप्रसाद कोरी यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत होती.

**मिळकतींचे वर्णन**
**बी-१०१, श्रीराम को.ऑप.हौ.सो.आनंद नगर, उरण ता.उरण, जि.रायगड ४००७०२**

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचाही हरकत नाही असे समजून अर्जदारांस कै.छोटेलाल सुकाप्रसाद कोरी हिचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९ माहे एप्रिल २०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**



मा.सोनावणे साहेब कोर्ट

**अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.३ रे सह दिवाणी न्यायाधिशसाहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.५२२/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.१४/०६/२०२२

**१) श्रीमती.सुनिता दत्ताराम भोईर, वय : ५० वर्षे**
रा.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
**२) राजेश्री दत्ताराम भोईर उर्फ**
**सौ.राजेश्री जगदीश कडू,** वय : ३१ वर्षे
रा.रुम नं.५१, वाशी गांव, मैसुर कॉलनी समोर,
आर.सी.एफ.कंपनीचे गेट नं.२ जवळ, चेंबूर, मुंबई ४०००७४
**३) सौ.प्रज्ञा संदेश पाटील, वय : ३० वर्षे**
रा.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, **कै.दत्ताराम दामू भोईर** हे दि.१७/०४/२०२१ रोजी के.जे.सोमय्या हॉस्पिटल मुंबई येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| न्हावे-१८९ | अ | २८१ | ०-२९-० |
| न्हावे-२१५ | १ अ | २२३ | ०-०२-५ |
| न्हावे-१८९ | १ अ | ६३ | ०-०८-६ |

अर्जदार हे **कै.दत्ताराम दामू भोईर** यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.२/५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**